**Indian Streams Research Journal**
Vol-1 Issue-6/Jully-2011
**ISSN: 2230-7850** Available online www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# महाराष्ट्रातील संत व त्यांची वाङ:मय निर्मिती मागील प्रेरणा, भूमिका आणि महत्व

अरविंद देशमुख
सहयोगी प्राध्यापक
गो.सी.टोंपे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सांदूरबाजार अमरावती

महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रातील संतांची ही परंपरा मध्ययुगात निर्माण झाली. महाराष्ट्रातील या काळातील समाज धर्मभोळया समजूती, धार्मिक कर्मकांड, दारिद्रय आणि अज्ञान यामध्ये अडकला होता. बहुजनांना सामाजिक विषमतेची चटके सहन करावे लागत होते. त्यांना ईश्वर भक्तीचा अधिकार नाकारला होता. अस्पृश्य वर्गाची स्थिती ही 'मानवतेला कलंक' अशा प्रकारची होती. अशा काळातच महाराष्ट्रात अनेक थोर संत जन्मास आले. त्यांनी समतेचा जोरदार पुरस्कार केला. यामुळे जातीभेदाच्या भिंती हादरु लागल्या. संताच्या या कार्यात त्यांनी निर्माण केलेले वाङ:मय महत्वपूर्ण ठरले. संताच्या या वाङ:मय निर्मिती मागे नेमकी प्रेरणा कोणाची होती, त्या पाठीमागे त्यांची भूमिका काय होती. याचाच आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यांत आला आहे.

## मध्ययुगीन महाराष्ट्राची समाजव्यवस्था :

पाश्चिमात्य राष्ट्राच्या दृष्टीने मध्ययुगाचा कालखंड हा धर्माचा प्रभाव असलेला कालखंड म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रातही यापेक्षा वेगळी स्थिती नव्हती. ' बाबा वाक्यम प्रमाणम् ' अशीच स्थिती महाराष्ट्रात होती. धर्माच्या नावाखाली समाजात अनेक अनिष्ठ प्रथा परंपरा आणि कर्मकांड निर्माण झाले. जातीव्यवस्थेसारख्या पध्दतीचे धर्मग्रंथातून समर्थन केले जात होते. या जातीव्यवस्थेमधूनच समाजात श्रेष्ठ आणि कनिष्ठ भावना निर्माण झाल्या होत्या. प्रत्येक जात स्वत:ला इतर जातीपेक्षा श्रेष्ठ समजत होती. प्रत्येक जातीचे रितीरिवाज वेगळे होते. अस्पृश्य वर्गाला साधे माणूसकीचेही अधिकार नाकारण्यांत आले होते. मंदिरामध्ये कुत्रा वा मांजर या पशुंना प्रवेश दिला जात होता. परंतू अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. म्हणजेच त्यांना ईश्वरभक्तीचा अधिकार नाकारला होता. सार्वजनिक पाणवटयावर पाणी भरण्यास त्यांना परवानगी नव्हती. त्यांच्या सावलीचाही विटाल मानला जात होता. यामुळेच समाजात सर्वत्र आणि सर्व क्षेत्रात विषमता निर्माण झाली होती. समाज अंधकारात सापडला

होता. अशा स्थितीत वारकरी संप्रदायामधील संतानी सामाजिक विषमतेने पिढीत असलेल्या वर्गाला आपल्या वांङःमयातून आशेचा किरण दाखविला.

## वारकरी संप्रदाय व संत

महाराष्ट्रातील भागवत धर्मातील वारकरी संप्रदायाला संताची थोर पंरपरा लाभली आहे. यामध्ये प्रामुख्याने संत ज्ञानेश्वर ( इ.स. 1275 ते 1296) यांचे नांव अग्रक्रमाने घेतले जाते. संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची प्रतिष्ठापना केली. संत नामदेवाने (इ.स. 1270 ते 1350) या संप्रदायाचा विस्तार केला. संत एकनाथांनी (इ.स. 1504 ते 1599) भागवत धर्माचे पुरुज्जीवन केले. तर संत तुकारामांनी (इ.स. 1598 ते 1649) समाजातील दाहकता नेमकेपणाने मांडली. वारकारी संप्रदायातील या संताच्या योगदानाबाबत बहिणाबाई म्हणतात की,

"संतकृपा झाली । इमारत फहा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।।
जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।"

## संताची वाङःमय निर्मितीमागील प्रेरणा

वारकरी संप्रदायातील संत वाङःमय हे कोणतीही वैयक्तिक महत्वाकाक्षा वा व्यक्तिगत यशाची अपेक्षा ठेवून निर्माण झले नाही. तसेच वाङःमयीन प्रेरणाही त्यामागे नव्हती. तर संतांनी आपल्या देवताशी भक्त म्हणून जो संवाद केला. आपली सुखदु:खे त्यांना सांगितली. त्यांना यामध्ये शुध्द आनंदाची अनुभूती प्राप्त झाली. ती इतरांनाही प्राप्त व्हावी. या तळमळीतून संतांनी आपला भक्तिमार्गाचा प्रवास विशद करण्यासाठी अभंग रचना केली. ज्या भागवत संप्रदायाचा एक भाग म्हणून संत साहित्य निर्माण झाले. तो संप्रदाय मुळीच समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी निर्माण झाला होता. म्हणूनच संत साहित्याच्या प्रेरणा संताच्या वैयक्तिक जीवनात नव्हे तर व्यापक अशा समाज जीवनात मिळतात.

संत वाङःमय निर्मितीमागे संत आणि परमेश्वर यांच्यातील संवाद ही जशी प्रेरणा होती. त्याचप्रमाणे तत्कालीन समाजस्थिती संतांना वाङःमय निर्मितीसाठी प्रेरक ठरली. यादव राजवटीत तेराव्या शतकातील समाजजीवन रुढी परंपरा व धार्मिक कर्मकांडानी जखडलेले होते. शुध्द भक्तीपेक्षा इतर अंगांना अधिक महत्व प्राप्त झाले होते. व्यक्तिगत यशाची किंवा प्रसिध्दीची इच्छा आणि वाङःमयनिर्मिती करावी अशी लेखक म्हणून महत्वाकांक्षा संताच्या साहित्य निर्मिती मागील प्रेरणा नव्हती. तर समाजाची अवनत स्थिती दूर करुन त्यांचा विकास व्हावा, व्यक्तिच्या चारित्र्याचे उन्मयन व्हावे, धर्माचे मानवतावादी उदार स्वरुप स्पष्ट व्हावे. विविध धर्मपंथ आणि दैवते यामुळे उडालेला गोंधळ लोकमनातून नष्ट व्हावा, लोकांची जीवननिष्ठा बळकट व्हावी व तिला निरोगी स्वरुप प्राप्त

व्हावे आणि देशी भाषेतून सर्वापर्यंत ज्ञानाचा प्रसार व्हावा. मुख्यतः या प्रेरणांनी संताचे वाङःमय निर्माण झाले आहे.

## <u>वारकरी संप्रदायातील संताचे वाङःमय</u>

महाराष्ट्रात वारकाीर संप्रदायातील संताची जी थोर परंपरा निर्माण झाली त्यांनी जे वाङःमय निर्माण केले. त्या पाठीमागे त्यांची विशिष्ट भूमिका होती. यापैकी संत ज्ञानेश्वराने ज्ञानेश्वरी, ही भगवत् गीतेवरील टीका, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी आणि अभंग गाथा अशी ग्रंथरचना केली. संत नामदेवाने सुमारे 2500 अभंग आणि सुमारे 125 हिन्दी पदे लिहीली. या हिन्दी पदापैकी शिख धर्मीयांच्या 'गुरुग्रंथसाहिबा' या ग्रंथात 'नामदेवजी की मुखबानी' या नावाने 61 हिन्दी पदे अंतभूत केली आहेत. संत एकनाथांनी चतु:श्लोकी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण ही ग्रंथरचना केली. याशिवाय त्यांची भारुडे, त्यांच्या अभंगाची एकनाथ गाथा, पदे आणि गौळणी या रचनादेखील विशेष प्रसिध्द आहेत. त्यांचे अभंग म्हणजे मराठी काव्याचे शाश्वत भूषणच मानले जाते. याशिवाय चोखामेळा व सावतामाळी, संत तुकारामाचे शिष्य संताजी महाराज यांचेही वाङःमय महत्वपूर्ण आहे.

## <u>संतांची वाङःमय निर्मितीमागील भूमिका</u>

वारकरी संप्रदायातील संतानी जे वाङःमय निर्माण केले. त्या पाठीमागे त्यांची निश्चित अशी भूमिका होती ......

1) तेराव्या शतकात समाजजीवन अत्यंत हलाखीचे होते. न्यायव्यवस्था कोलमडण्याच्या बेतात होती. आर्थिक दुरावस्था झाली होती. सामाजिक चारित्र्याचा ऱ्हास झला होता. समाजजीवन अस्थिर बनले होते. अशा परिस्थितीमधून समाजाला बाहेर काढण्याची तळमळ संतांना होती.
2) मध्ययुगात धर्म हे समाजजीवनाचे केंद्र होते. म्हणून धर्माचे खरे स्वरुप सामान्य जनतेला दाखवावे आणि मानवतेचा अनुसरणारी भक्ती हेच चारित्र्यशुध्दीचे साधन बनवावे असे संतांना वाटले.
3) समाजात त्याकाळी विविध मतप्रवाह प्रचलित होते. उपासना पध्दती रुढ होत्या. कर्मकांडाचे अनावश्यक स्तोम माजले होते. धर्म हा रुढी- प्रथा व केवळ कर्मठ आचारामध्ये गुंतलेला होता. अशा वेळेस धर्माचे खरे स्वरुप स्पष्ट करण्याची आवश्यकता होती परमेश्वर एक आहे व तो सर्व प्राणिमात्रांमध्ये असल्यामुळे सर्व माणसे समान आहेत. यासाठी सदाचार, शुध्दमन व सर्व प्राणीमात्राविषयी जिव्हाळा याने व्यक्तिची उन्नती होऊ शकते. यासाठी संतांनी कीर्तन प्रवचन अभंग रचना - भाष्यग्रंथ इत्यादी माध्यमातून आपले विचार समाजापर्यंत नेण्याच्या भूमिकेतून वाङःमय निर्मिती केली.

## संत वाङःमयाचे समाजजीवनाच्या दृष्टीने महत्व

वारकरी संप्रदायातील संतानी अध्यात्माच्या मर्यादित क्षेत्रात अत्यंत महत्वपूर्ण परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या प्रयत्नाचे सामाजिक जीवनावर, चांगले परिणाम घडून आले. यामुळे संत वाङःमयाचे सामाजिक जीवनाच्या दृष्टीने फार महत्व आहे. ते असे --

1) संतानी अमंगल असे भेदाभेद मिटवून एकता व समानता स्थापित करण्याची संताची धडपड होती. त्यासाठी त्यांनी व्यक्तिचा सदाचार ही त्यांचा सुधारणेचा मूलभूत बिंदू मानला. यादृष्टीने संत तुकाराम महाराजांचा खालील अभंग महत्वपूर्ण ठरला.

धन मेळवूनि कोटी । सवे न ये रे लंगोटी ।।
पाने खाशील उदंड । अंती जासी सुकल्या तोंडे ।।
पलंग न्याहाल्या सुपती । शेवटी गोवऱ्या सांगाती ।
तुका म्हणे राम । एक विसरता श्रम

संत तुकारामाच्या या अभंगाचा मतितार्थ असा की, "मनुष्याची सर्वात मोठी संपत्ती म्हणजे त्याचे शील आणि चारित्र्य. त्यानं केलेली सत्कृत्यं हीच त्याला अखेरपर्यंत सोबत करतात. त्याची सत्प्रवृत्ती त्याला खऱ्या अर्थानं संपन्न बनवित असते. रिकाम्या हातानं आला आहेस. जाताना कमरेची लंगोटी सुध्दा येणार नाही. याप्रमाणे संत तुकारामांनी विदारक सत्यावर या अभंगाद्वारे बोट ठेवले आहे. अशा प्रकारच्या अभंग रचनेतूनच आचार-विचारातील विकृती दूर होण्यास मदत झाली. संतानी कर्मकांडाला दूर सारुन ईश्वरी उपासनेसाठी नामसंकीर्तनाचा सर्वांना सुलभ असा मार्ग दाखविला."

2) संतानी लोकांना संसारापासून दूर न जाता संसारात राहूनच भक्तीसाधना कशी करावी ? याचा आदर्श घालून दिला.

3) देव आणि भक्ति यांचा थेट संबंध संतांनी घडवून आणला. थोडक्यात सकळांसी आहे येथे अधिकारा या संत तुकारामाच्या प्रसिध्द उक्तीप्रमाणे भक्तिचा अधिकार सर्वांना आहे असे संतांनी दाखवून दिले.

4) देव एकच आहे. असे सांगून संतानी अनेक दैवतांचा गोंधळ दूर केला आणि त्या देवाशी भक्तीतील नाते हे मायलेकरांचे आहे असे सांगून सामान्य माणसांच्या दु:ख दैन्याला देवकृपेचा दिलासा मिळतो असे आश्वासन सर्वांना दिले. यादृष्टीने संत तुकारामाचा खालील अभंग महत्वपूर्ण आहे.

नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ।।
बळिया माझ पंढरिराव । जो या देवांचाही देव ।।
रंडी चंडी शक्ति । मध्यमांसाते भक्षिती ।।
बहिराव खंडेराव । शेटी सुटी साठी देव ।।
गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ।।

मुंज्या म्हैसासुरे । हे तो कोण लेखी पोरे ।।
वेताळे फेताळे । जळो त्यांचे तोंड काळे ।।
तुका म्हणे चित्ती । धरा रखुमाई पती ।।

संत तुकारामांनी अशा प्रकारच्या अभंगरचनेतून अज्ञानी लोकांच्या विकृत देवकल्पनेवर अर्थपूर्ण टीका केली. बहुदेवतोपासनेला ठामपणे विरोध केला. तसेच एकेश्वरवाद हे भारतीय तत्वज्ञानाचं वैशिष्ट्ये आहे. अलंकारिक अर्थानं तेहतीस कोटी देवांची कल्पना मांडली असली तरी तो विश्वचालक परमात्मा एकच आहे. हा विचार वारकरी पंथानं रुजवला. अज्ञानी लोकांना नवस- सायास, तीर्थयात्रा आणि प्रत्येक दिवशी भिन्न-भिन्न दैवतांची उपासना यापासून दूर रहा असा स्पष्ट संदेश दिला. ईश्वर एकच आहे आणि तो न्यायी व दयावत्सल आहे. तो कोणाचा बळी मागत नाही. सर्व विश्वाचा निर्माता आणि रक्षक नैवेदयासाठी प्राण्यांचा बळी मागेल तरी कसा ? हा महत्वपूर्ण विचार समाजप्रबोधनाच्या दृष्टीने फार परिणाम कारक ठरला.

5) संतांनी सामान्य माणसांपर्यंत ज्ञान पोहोचावे यासाठी आग्रह धरला आणि लोकांच्या बोली भाषेत साहित्य निर्मिती केली इ.

**सारांश :**

एकूणच महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संतांनी ज्या प्रेरणेतून, ज्या भूमिकेतून वाङःमय निर्मिती केली ती समाजाच्यादृष्टीने संजीवनी ठरली.

अज्ञान अंधकार अंधश्रध्दा व धार्मिक कर्मकांड अशा अंधकारात अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्याच्या दृष्टीने संतवाङःतय उपकारक ठरले. भौतिक दुरावस्था, आत्मसन्मानाचे खच्चीकरण आणि मानसिक गुलामगिरी यामुळे जडःमूढ झलेल्या समाजाला त्याच्या अगतिक अवस्थेतून वर काढण्यासाठी संतांनी जे प्रयत्न केले ते यशस्वी झाले. समाजव्यवस्थेला धक्का न लावता संतांनी स्त्री व शुद्रांना आपल्या वाङःमयातून आत्मविकासाची वाट दाखविली. त्यांचे नैतिक सामर्थ्य जागृत केले. संतांनी वाङःमयातून सामान्यांना प्रापंचिक दुःखावर मात करण्यासाठी दिलासा व बळ दिले. मनुष्य कोणत्याही जातीचा असो. त्याला आत्मोध्दाराची संधी आहे असा विश्वास संतानी आपल्या साहित्यातून दिला.

**संदर्भ :**


1) वि.शं. चौगुले, संत, समाज आणि अध्यात्म, मधुरा प्रकाशन, ठाणे
2) डॉ. निर्मलकुमार फडकुले (मनोगत), संत साहित्य : सौंदर्य आणि सामर्थ्य, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.
3) डॉ. यु.म.पठाण, संत साहित्य चिंतन, प्रकाशिका- अल्मास पठाण, औरंगाबाद
4) गं.ब.सरदार, संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, श्री विदया प्रकाशन, पुणे
5) डॉ. मुकुंद दातार, वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी- स्नेहल प्रकाशन, पुणे
6) महानुभाव व संतवाङःमय निर्मिती व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. निर्मलकुमार फडकुले, संत तुकारामाचा जीवनविचार, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.